मंगळवार दि. २८ जुलै २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३२७ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जीवनदाता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# पीआर कार्ड नव्हे तर मोजणी प्रमाणपत्र वाटप : दावा करणाऱ्यांनी अगोदर 'नीट' अभ्यास करावा

## माजी आमदार कैलास गोरंटयाल यांचा खोतकरांना खोचक टोला

**जालना -प्रतिनीधी**

शहरातील झोपडपट्टी धारकांना मोजणी प्रमाणपत्र वितरीत होत असतांना पीआर कार्डचे स्वप्न साकार झाल्याचा अजब दावा करत स्वतःची पाठ थोपटून घेण्याचा केविलवाणा प्रयत्न करणाऱ्या विद्यमान आमदारांनी अगोदर प्रशासकीय कामकाजाचा ''नीट'' अभ्यास करावा असा खोचक टोला माजी आमदार तथा भाजपा नेते कैलास गोरंटयाल यांनी नामोल्लेख न करता आ.अर्जुन खोतकर यांना लगावला आहे.

जालन्यातील मुक्तेश्वर लॉन्स येथे रविवारी जिल्हा प्रशासनातर्फे आयोजित करण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान कार्यक्रमात जालना मनपाच्या महापौर वंदना मगरे यांच्या हस्ते शहरातील झोपडपट्टी भागातील काही रहिवाश्यांना प्रातिनिधिक स्वरूपात जागा मोजणी प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. मात्र, विद्यमान आमदारांनी चक्क पीआर कार्ड वाटप केल्याचा कांगावा करत, आपल्या पाठपुराव्याला यश आले असा अजब दावा करून फुकटचे श्रेय लाटण्याचा प्रयत्न केल्यामुळे माजी आमदार तथा भाजपा नेते कैलास गोरंटयाल यांनी त्यांचा



नामोल्लेख न करता सडकून टीका केली आहे. गोरंटयाल म्हणाले की,जालना शहरात जवळपास ४२ पेक्षा अधिक झोपडपट्या असून त्या ठिकाणी हजारो गरीब कुटुंब मागील अनेक वर्षांपासून वास्तव्यास आहेत. घर आहे, पण पीआर कार्ड नसल्यामुळे या सर्वच झोपडपट्या मधील कुटुंबांना सरकारच्या विविध योजनांच्या लाभासह बँक कर्जापासून वंचित रहावे लागते ही बाब आपण स्वतः तसेच माजी केंद्रीयमंत्री रावसाहेब पा.दानवे, माजी मंत्री आ.बबनराव लोणीकर, भाजपा जिल्हाध्यक्ष आ. नारायण कुचे,आ.संतोष दानवे, भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे आदींनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निर्दशनास आणून दिली होती. सर्वच झोपडपट्टी धारकांना त्यांच्या घराचे हक्काचे पीआर कार्ड मिळाले पाहिजे अशी आग्रही भूमिका मुख्यमंत्री आणि महसूल मंत्र्यांकडे मांडण्यात आली होती. शिवाय याच अनुषंगाने आपण दि.२५ सप्टेंबर २०२५ रोजी राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची मंत्रालयात भेट घेऊन *(पान २ वर)*

### महसूल मंत्र्यांच्या उपस्थितीत होणार पीआर कार्डचे वितरण

शहरातील जवळपास सर्वच झोपडपट्टी भागातील रहिवाशांचे सर्वेक्षण व जागा मोजणीचे काम पूर्ण झाले आहे. जागा मोजणी बाबतचा अहवाल जालना मनपातर्फे लवकरच जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख अधिकारी या कार्यालयाकडे सादर करण्यात येणार असल्याचे माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी सांगितले. या अहवालाची तपासणी केल्यानंतर जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख अधिकारी यांच्या मान्यतेनंतर तालुका उपअधीक्षक भूमी अभिलेख अधिकारी जालना या कार्यालयामार्फत पीआर कार्ड तयार करण्यात येणार असून सदर पीआर कार्ड तयार झाल्यानंतर जालना मनपातर्फे व्यापक कार्यक्रमाचे आयोजन करून त्यात राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते आणि माजी केंद्रीयमंत्री रावसाहेब पाटील दानवे, माजी मंत्री आ.बबनराव लोणीकर, भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ.नारायण कुचे, आ.संतोष दानवे, भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत झोपडपट्टी धारकांना पीआर कार्डचे अधिकृतपणे वाटप करण्यात येणार असल्याचे माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी सांगितले.

# इतिहास महाराष्ट्राचा... बालकलाकारांच्या कलेतून उलगडणार!

**जालना | प्रतिनिधी**

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेशी संलग्न बालरंगभूमी परिषद, जालना शाखेच्या* वतीने आयोजित *इतिहास महाराष्ट्राचा २०२६ या राज्यस्तरीय महोत्सवाची जालना जिल्हास्तरीय प्राथमिक फेरी रविवार, दि. २ ऑगस्ट २०२६* रोजी जालना येथे आयोजित करण्यात आली आहे. विजेत्या स्पर्धकांची अंतिम फेरी दि. ९ ऑगस्ट २०२६ रोजी

माऊली सभागृह, अहिल्यानगर येथे होणार आहे. महाराष्ट्राच्या भूमीला शौर्य, त्याग, न्याय आणि सुशासनाचा गौरवशाली वारसा लाभला आहे. हा दैदीप्यमान इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचावा, विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाबद्दल अभिमान व जिज्ञासा निर्माण व्हावी तसेच बालकलाकारांना आपल्या अभिनय कौशल्याचे हक्काचे व्यासपीठ मिळावे, हा या महोत्सवामागील प्रमुख उद्देश आहे.

यंदाच्या महोत्सवाचा मुख्य विषय लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रेरणादायी जीवनावर आधारित आहे. त्यांच्या पराक्रम, न्यायप्रियता, प्रजाहितदक्ष राज्यकारभार, शिक्षणविषयक दूरदृष्टी आणि समाजहितासाठी केलेल्या कार्यातील विविध प्रसंगांचे प्रभावी नाट्यरूप सादरीकरण स्पर्धकांकडून सादर करण्यात येणार आहे. या महोत्सवात एकपात्री अभिनय, नाट्यछटा, स्वगत तसेच समूह नाट्य सादरीकरण अशा विविध प्रकारांमध्ये स्पर्धा होणार आहे. स्पर्धेचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करण्यात आले आहे एकल गट क्र. १ : इयत्ता १ ली ते ५ वी, एकल गट क्र. २ :इयत्ता ६ वी ते १० वी, समूह गट क्र. ३ :इयत्ता १ ली ते १० वी एकल सादरीकरणासाठी ३ ते ५ मिनिटे, तर समूह सादरीकरणासाठी *५ ते ८ मिनिटांचा *(पान २ वर)*

# जिल्ह्यात यलो अलर्ट; सोसाट्याचा वारा, पावसाची शक्यता; दक्षता घेण्याचे प्रशासनाचे आवाहन

**जालना - प्रतिनिधी**

प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, कुलाबा, मुंबई यांनी दिलेल्या सूचनेनुसार जालना जिल्हयात दि. २७ जुलै रोजी यलो () अलर्ट जारी केला असुन तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाटासह वादळी वारे, हलका ते मध्यम पाऊस आणि सोसाट्याचा वारा (ताशी ३०-४० कि.मी.प्र.ता. वेगाने) येण्याची शक्यता वर्तवली आहे. दि. २८ ते ३१ जुलै रोजी यलो () अलर्ट जारी केला असुन तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाटासह वादळी वारे, हलका ते मध्यम पाऊस आणि सोसाट्याचा वारा (ताशी ४०-५० कि.मी.प्र.ता. वेगाने) येण्याची शक्यता वर्तवली आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनातर्फे जिल्ह्यातील नागरीकांना खालीलप्रमाणे दक्षता घेणेबाबत आवाहन करण्यात येत आहे.

मेघगर्जनेच्या वेळी, वीजा चमकत असताना किंवा वादळीवारे वाहत असतांना झाडाखाली किंवा झाडांजवळ उभे राहू नये. वीजेपासून बचावासाठी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा, धोकादायक ठिकाणी सेल्फी काढू नये. गडगडाटीच्या वादळादरम्यान व वीजा चमकतांना कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नये. वीजेच्या सुवाहक भागांशी संपर्क टाळावा, ट्रॅक्टर्स, शेतीची अवजारे, मोटारसायकल / सायकल यांचेपासून दूर रहावे,मोकळे मैदान, झाडाखाली, टॉवर्स, ध्वजांचे खांब, विद्युत/दिव्यांचे खांब, धातुचे कुंपण, विदयुतवाहिनी अथवा ट्रॉन्सफोर्मजवळ थांबू नये. सर्व प्रकारच्या अर्थातरी लटकणा-या *(पान २ वर)*

## नोएडातील राष्ट्रीय कराटे स्पर्धेत जालना जिल्ह्याची सुवर्ण झेप

# जालन्यात विजेत्या कराटेपटूंचे जल्लोषात स्वागत; महापौर वंदना मगरे यांच्या हस्ते सत्कार, अक्षय गोरंट्याल यांची उपस्थिती, शहरातून विजयी रॅली





**जालना | प्रतिनिधी**

भारतीय आर्ट्स अँड स्पोर्ट्स यूथ गेम असोसिएशनच्या वतीने उत्तर प्रदेशातील नोएडा इंडोर स्टेडियम येथे आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय यूथ गेम कराटे चॅम्पियनशिप २०२६ स्पर्धेत जालना जिल्ह्याच्या कराटेपटूंनी दैदिप्यमान कामगिरी करत महाराष्ट्रासह जिल्ह्याचे नाव राष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल केले. देशभरातील विविध राज्यांतील शेकडो कराटेपटूंमध्ये जालन्याच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कौशल्य, शिस्त आणि जिद्दीच्या जोरावर ११ सुवर्ण, ५ रौप्य आणि ७ कांस्य अशी एकूण २३ पदके पटकावत उल्लेखनीय यश संपादन केले. सेन्साई रुपेंद्र गोपाल पारचा यांच्या मार्गदर्शनाखाली जालना जिल्ह्यातील खेळाडूंनी महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले. काता आणि कुमिते या दोन्ही प्रकारांत त्यांनी प्रभावी कामगिरी करत प्रतिस्पर्ध्यांवर मात केली. खेळाडूंच्या या यशामुळे जालना जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्र, राजस्थान, गुजरात, पंजाब, उत्तर प्रदेश, बिहार, उत्तराखंड, दिल्ली आणि हरियाणा या राज्यांतील खेळाडूंनी सहभाग घेतला होता. अत्यंत चुरशीच्या वातावरणात पार पडलेल्या या स्पर्धेत जालन्याच्या खेळाडूंनी आत्मविश्वासपूर्ण खेळ करत अनेक गटांमध्ये पदके पटकावली. काता प्रकारातील पदक विजेते सुवर्णपदक विजेते : निवांशी वलकट्टी, अनुष्का म्हेत्रे, तन्वी खरटमल, आरुषी वलकट्टी, वैष्णवी लुटे, पूर्वा माने, लावण्या गुडला, ऋषिकेश श्रीराम, ओमकार गुट्टे, शेलमॉन गुडेकर आणि नयन गोमतीवाले. रौप्यपदक विजेते : वैष्णवी लोखंडे, दिव्यता कोठारी आणि आकांक्षा चिल्का. कांस्यपदक विजेता : यशवर्धन चिल्का. कुमिते प्रकारातील पदक विजेते रौप्यपदक विजेते : निवांशी वलकट्टी आणि लावण्या गुडला. कांस्यपदक विजेते : वैष्णवी लोखंडे, दिव्यता कोठारी, आकांक्षा चिल्का, वैष्णवी लुटे, ऋषिकेश श्रीराम आणि नयन गोमतीवाले. जालन्यात विजेत्यांचे जल्लोषात स्वागत राष्ट्रीय स्पर्धेत यश मिळवून जालना येथे परतलेल्या खेळाडूंचे शहरात उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथे आयोजित सत्कार समारंभात महापौर वंदनाताई मगरे आणि नगरसेवक अक्षय गोरंट्याल यांच्या प्रमुख उपस्थितीत सर्व पदक विजेत्या खेळाडूंचा सन्मान करण्यात आला. यावेळी राज स्वामी, सखुबाई पनबिसरे, सेन्साई रुपेंद्र गोपाल पारचा, स्टेअर्स जालना जिल्हाध्यक्ष दीपक शेळके, उपाध्यक्ष गणेश श्रीराम, उपाध्यक्ष प्रशांत प्रेम भरती, नवीन कुमार वलकट्टी, सचिन लुटे, गणेश चिप्पा, सुजित माने, राजपाल पारचा, किशोर गुडला, भगवान म्हेत्रे यांच्या सह कराटेप्रेमी, पालक, प्रशिक्षक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांनी खेळाडूंचे अभिनंदन करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच राष्ट्रीय स्तरावर मिळविलेल्या या यशामुळे जालना जिल्ह्याचा गौरव वाढल्याचे त्यांनी सांगितले. खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय स्तरावरही जालना जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करावे अक्षय गोरंट्याल राष्ट्रीय यूथ गेम कराटे चॅम्पियनशिपमध्ये उल्लेखनीय यश मिळवून जालना जिल्ह्याचा गौरव वाढविणाऱ्या सर्व कराटेपटूंचे नगरसेवक अक्षय गोरंट्याल यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले. यावेळी बोलताना त्यांनी, ''राष्ट्रीय स्तरावर मिळवलेले हे यश निश्चितच अभिमानास्पद आहे. याच जिद्दीने आणि मेहनतीने जालना जिल्ह्यातील खेळाडूंनी भविष्यात आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्येही चमकदार कामगिरी करून देशासह जालना जिल्ह्याचे नाव जगभर उज्ज्वल करावे,'' अशा शुभेच्छा दिल्या. तसेच खेळाडूंना आवश्यक त्या सर्व प्रकारच्या प्रोत्साहनासाठी आपण सदैव त्यांच्या पाठीशी राहू, अशी ग्वाहीही त्यांनी दिली. सत्कारानंतर विजेत्या खेळाडूंची भव्य विजयी रॅली काढण्यात आली. ही रॅली छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथून सुरू होऊन नारायण स्कूल, भीमनगर, रामनगर, वाल्मिकी नगर मार्गे वाल्मिकी मंदिर येथे समारोप करण्यात आला. रॅलीदरम्यान नागरिकांनी टाळ्यांच्या गजरात आणि फुलांच्या वर्षावात खेळाडूंचे स्वागत केले. परिसरात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले होते.

### पावसाच्या सरींनी केले विजेत्यांचे स्वागत!

राष्ट्रीय कराटे स्पर्धेत घवघवीत यश संपादन करून जालना येथे परतलेल्या खेळाडूंच्या सत्कार सोहळ्यावेळी निसर्गानेही आनंदोत्सवात सहभाग नोंदवला. सत्कार सुरू असतानाच पावसाच्या हलक्या सरी कोसळल्या आणि उपस्थितांनी त्याला विजेत्यांवरील निसर्गाच्या शुभाशीर्वादाची उपमा दिली. पावसाच्या साक्षीने झालेला हा सत्कार आणि त्यानंतरची विजयी रॅली खेळाडूंसाठी अविस्मरणीय ठरली. उपस्थित नागरिकांनी टाळ्यांच्या गजरात व जल्लोषात खेळाडूंचे स्वागत करून त्यांच्या यशाचा आनंद द्विगुणित केला.

# जालन्यात गो-सन्मान महा रॅलीला अभूतपूर्व प्रतिसाद

## २५,४२७ पानांवरील ६,७१,३३४ जनसमर्थनाच्या स्वाक्षऱ्यांसह राष्ट्रपती, पंतप्रधान, राज्यपाल व मुख्यमंत्र्यांना जिल्हाधिकाऱ्यां मार्फत निवेदन

**जालना - प्रतिनिधी**

गोसंरक्षण, गोसंवर्धन आणि गोसेवेबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या गो-सन्मान आवाहन अभियान अंतर्गत रविवारी (२७ जुलै २०२६) जालना शहरात काढण्यात आलेल्या गो-सन्मान महा रॅलीला अभूतपूर्व प्रतिसाद लाभला. श्रीराम मंदिर, आर.पी. रोड येथून प्रारंभ झालेल्या या भव्य रॅलीत संत-महंत, विविध हिंदू संघटनांचे पदाधिकारी, गोभक्त, माता-भगिनी, युवक आणि हजारो नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत जालना शहर भगवामय केले.

टाळ-मृदंगाच्या निनादात, हरिनाम संकीर्तनाच्या गजरात आणि भगव्या ध्वजांच्या दिमाखदार लाटांमध्ये रॅलीला प्रारंभ झाला. ''श्रीराम जय राम जय जय राम'', ''गोमाता की जय'', ''भारत माता की जय'' अशा जयघोषांनी संपूर्ण शहर दुमदुमून गेले. रॅली मार्गावर धार्मिक, भक्तिमय आणि राष्ट्रभक्तीचे वातावरण निर्माण झाले होते. अनेक सहभागी पारंपरिक वेशभूषेत सहभागी झाल्याने रॅलीचे आकर्षण अधिकच वाढले. रॅली शहरातील प्रमुख मार्गांवरून अत्यंत शिस्तबद्ध





पद्धतीने मार्गक्रमण करत असताना नागरिकांनी ठिकठिकाणी पुष्पवृष्टी करून सहभागींचे स्वागत केले. अनेक सामाजिक संस्था, व्यापारी, नागरिक आणि स्वयंसेवकांनी पिण्याच्या पाण्याची, सरबताची तसेच अल्पोपहाराची व्यवस्था करून रॅलीत सहभागी झालेल्यांची सेवा केली. मार्गभर महिलांचा मोठा सहभाग, युवकांचा उत्साह आणि लहान मुलांची उपस्थिती लक्षवेधी ठरली. गोसंरक्षणाचा संदेश समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविणे, गोसेवेबाबत जनजागृती निर्माण करणे आणि देशभरात गोमातेच्या संरक्षणासाठी कठोर कायदा करण्याची मागणी प्रभावीपणे शासनापर्यंत पोहोचविणे हा या रॅलीचा प्रमुख उद्देश होता. रॅलीदरम्यान गोसेवेचे महत्त्व, भारतीय संस्कृतीतील गोमातेचे स्थान आणि पर्यावरण संरक्षणामध्ये गोवंशाचे योगदान याबाबत विविध फलक व घोषवाक्यांद्वारे जनजागृती करण्यात आली.

**६ लाख ७१ हजारांहून अधिक नागरिकांच्या स्वाक्षऱ्यांसह निवेदन**

रॅलीनंतर सर्व सहभागी जालना जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचले. तेथे मा. राष्ट्रपती, मा. पंतप्रधान *(पान २ वर)*

# संपादकीय....

## आता लक्ष्य आंतरराष्ट्रीय व्यासपीठ!

नोएडामध्ये पार पडलेल्या राष्ट्रीय यूथ गेम कराटे चॅम्पियनशिप २०२६ मध्ये जालना जिल्ह्याच्या खेळाडूंनी मिळवलेली ११ सुवर्ण, ५ रौप्य आणि ७ कांस्य अशा २३ पदकांची कमाई ही केवळ पदकांची संख्या नाही, तर ग्रामीण आणि निमशहरी भागातील क्रीडा गुणवत्तेचा राष्ट्रीय स्तरावर उमटलेला ठसा आहे. जालना हा दुष्काळ, शेती आणि उद्योगांसाठी ओळखला जाणारा जिल्हा असला तरी आता तो गुणवत्तापूर्ण खेळाडू घडविणाऱ्या जिल्ह्यांमध्येही आपले स्थान निर्माण करू लागला आहे. या यशामागे केवळ खेळाडूंची मेहनत नाही, तर प्रशिक्षक सेन्साई रुपेंद्र गोपाल पारचा यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, पालकांचे प्रोत्साहन आणि खेळाडूंची जिद्द यांचा मोठा वाटा आहे. मर्यादित सुविधा, आर्थिक अडचणी आणि अनेक अडथळ्यांवर मात करून राष्ट्रीय स्तरावर सुवर्ण यश मिळविणे ही नक्कीच कौतुकास्पद बाब आहे. आज कराटेसारख्या खेळांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलत आहे. हा खेळ केवळ स्वसंरक्षण शिकवत नाही, तर शिस्त, आत्मविश्वास, संयम, मानसिक स्थैर्य आणि नेतृत्वगुण विकसित करतो. त्यामुळे अशा खेळांना प्रोत्साहन देणे ही केवळ क्रीडा धोरणाची नव्हे, तर समाज घडविण्याची गरज आहे. मात्र, प्रत्येक वेळी खेळाडूंनी पदके जिंकायची आणि त्यानंतर केवळ सत्कार करून समाधान मानायचे, ही परंपरा बदलण्याची वेळ आली आहे. फुलांचा हार, शाल आणि श्रीफळ यापलीकडे जाऊन या खेळाडूंना दर्जेदार प्रशिक्षण, आधुनिक उपकरणे, आहार भत्ता, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी आर्थिक मदत, तसेच शिष्यवृत्तीची आवश्यकता आहे. अन्यथा अनेक प्रतिभावान खेळाडू आर्थिक मर्यादांमुळे मधेच खेळ सोडण्यास भाग पडतात. जालना जिल्ह्यात स्वतंत्र कराटे प्रशिक्षण केंद्र, आधुनिक क्रीडा संकुल आणि नियमित राष्ट्रीय दर्जाच्या स्पर्धा आयोजित करण्यासाठी लोकप्रतिनिधी, उद्योग क्षेत्र आणि प्रशासन यांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे. खेळो इंडियासारख्या योजनांचा लाभ अधिकाधिक खेळाडूंना मिळाला पाहिजे. जिल्ह्यातील शाळा-महाविद्यालयांनीही कराटेला प्राधान्य देऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.

राष्ट्रीय पातळीवरील हे यश आता आंतरराष्ट्रीय पदकांमध्ये रूपांतरित करणे, हे पुढचे लक्ष्य असले पाहिजे. त्यासाठी दीर्घकालीन नियोजन, वैज्ञानिक प्रशिक्षण आणि आर्थिक पाठबळ अत्यावश्यक आहे. केवळ प्रशिक्षक किंवा पालकांवर ही जबाबदारी सोडून चालणार नाही; प्रशासन, लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था आणि उद्योग क्षेत्र यांनीही या खेळाडूंच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले पाहिजे.

आज जालना जिल्ह्याच्या या कराटेपटूंनी सिद्ध करून दाखवले आहे की, प्रतिभेला मोठ्या शहरांची गरज नसते; गरज असते ती जिद्दीची, मेहनतीची आणि योग्य मार्गदर्शनाची. हीच जिद्द कायम राहिली आणि त्याला आवश्यक सुविधा मिळाल्या, तर उद्याच्या आशियाई, राष्ट्रकुल किंवा ऑलिम्पिक स्पर्धांमध्येही जालन्याचा तिरंगा अभिमानाने फडकताना दिसेल.

राष्ट्रीय स्पर्धेतील ही सुवर्ण कामगिरी हा शेवट नाही, तर एका मोठ्या प्रवासाची सुरुवात आहे. आता जालना जिल्ह्याच्या खेळाडूंनी राष्ट्रीय विजेते या ओळखीपलीकडे जाऊन आंतरराष्ट्रीय विजेते म्हणून देशाचे नाव उज्ज्वल करण्यासाठी वाटचाल करावी, हीच अपेक्षा. त्या दिशेने समाजाने आणि शासनानेही त्यांना भक्कम साथ देणे, हीच या यशाला खरी सलामी ठरेल.

दैनिक युवा आदर्श दि. २८-०७-२०२६

**CHANGE IN NAME**

I have Change My name From
Old Name
Meraj Begum Md Basheer
New Name
Meraj Faim Momin
As per my Documents
Address:- Chamada Bajar, Jalna, Jalna, Jalna, Maharashtra -431203

# ऑलिम्पिक पदक विजेत्या मीराबाई चानू : जिद्द, संघर्ष आणि यशाचा प्रेरणादायी प्रवास

ग्लासगो येथे सुरू आलेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा २०२६ मध्ये भारताची दिग्गज ऑलिम्पिक पदक विजेती सुवर्णकन्या मीराबाई चानू हिने इतिहास घडवला. स्पर्धेच्या चौथ्या दिवशी महिलांच्या ४८ किलो वजनी गटात सुवर्णपदकाला गवसणी घातली. या विलक्षण कामगिरीसह तिने राष्ट्रकुल स्पर्धेमधील आपले सलग तिसरे सुवर्णपदक जिंकण्याचा पराक्रम केला. अशी कामगिरी करणारी ती भारताची पहिलीच वेट लिफ्टर खेळाडू आहे. तिच्या या सुवर्ण कामगिरीमुळे भारताचा तिरंगा पुन्हा एकदा डौलाने फडकला आहे. तिच्या या ऐतिहासिक कामगिरीचा देशवासीयांना सार्थ अभिमान आहे.

अर्थात अशी ऐतिहासिक कामगिरी करण्यासाठी वर्षानुवर्षे कठोर मेहनत, प्रचंड संयम आणि अविरत संघर्ष करावा लागतो. भारताची स्टार वेटलिफ्टर मीराबाई चानू ही अशाच संघर्षातून घडलेली प्रेरणादायी व्यक्ती आहे. तिचा प्रेरणादायी प्रवास हा केवळ एका खेळाडूचा नसून, प्रतिकूल परिस्थितीवर मात करून स्वप्न पूर्ण करणाऱ्या प्रत्येक युवक-युवतीसाठी प्रेरणादायी आहे.

मणिपूरमधील एका छोट्याशा आणि अतिशय सामान्य कुटुंबात ८ ऑगस्ट १९९४ रोजी मीराबाईचा जन्म झाला. घरची आर्थिक परिस्थिती बेताची होती. लहानपणापासूनच ती घरासाठी सरपण आणण्याचे काम करत असे. तिची शारीरिक ताकद पाहून कुटुंबीयांनाही तिच्यातील वेगळेपण जाणवले. त्याच काळात ऑलिम्पिक पदक विजेती कुंजाराणी देवी यांच्यापासून प्रेरणा घेऊन तिने वेटलिफ्टिंगमध्ये करिअर करण्याचा निर्धार केला. सुरुवातीचा प्रवास मात्र अत्यंत खडतर होता. गावात योग्य प्रशिक्षणाची सुविधा नव्हती. लोखंडी बार नसल्यामुळे तिने बांबूच्या काठीवर सराव केला. प्रशिक्षणासाठी दररोज अनेक किलोमीटरचा प्रवास करावा लागे. पौष्टिक आहाराचीही कमतरता होती. तरीही या अडचणींनी तिची जिद्द कमी केली नाही. मेहनत, शिस्त आणि चिकाटी यांच्या जोरावर तिने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये यश मिळवण्यास सुरुवात केली. २०१४ च्या राष्ट्रकुल स्पर्धेत तिने रौप्यपदक, तर २०१७ च्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत सुवर्णपदक जिंकून जगाचे लक्ष वेधून घेतले.

मात्र २०१६ च्या रिओ ऑलिम्पिकमध्ये अपेक्षाभंग झाला. स्पर्धेदरम्यान वजन उचलण्यात अपयश आल्याने तिला पदक मिळवता आले नाही. अनेक खेळाडू अशा अपयशानंतर खचून जातात; परंतु मीराबाईने या पराभवाला नव्या यशाची प्रेरणा बनवली. स्वतःच्या चुका सुधारल्या, अधिक मेहनत घेतली आणि पुन्हा नव्या जोमाने तयारीला लागली. या अथक परिश्रमाचे फळ तिला टोकियो ऑलिम्पिकमध्ये मिळाले. महिलांच्या ४९ किलो गटात रौप्यपदक जिंकत तिने भारताच्या ऑलिम्पिक इतिहासात नवा अध्याय लिहिला. वेटलिफ्टिंगसारख्या ताकदीच्या खेळात भारतीय महिलाही जागतिक स्तरावर यश मिळवू शकतात, हे तिने सिद्ध करून दाखवले. मीराबाई चानूची कहाणी आपल्याला शिकवते की, यशासाठी केवळ सुविधा पुरेशा नसतात; त्यासाठी ध्येयाप्रती निष्ठा, अपार मेहनत, आत्मविश्वास आणि संकटांशी लढण्याची तयारी आवश्यक असते. अपयश हा शेवट नसून तो यशाकडे नेणारा महत्त्वाचा टप्पा आहे, हे तिच्या जीवनातून स्पष्ट होते.

आज मीराबाई चानू ही केवळ भारताची यशस्वी वेटलिफ्टर नाही, तर लाखो तरुण-तरुणींसाठी प्रेरणेचा अखंड झरा आहे.

तिचा संघर्ष सांगतो की, स्वप्ने मोठी असतील, मेहनत प्रामाणिक असेल आणि जिद्द अढळ असेल तर कोणतेही ध्येय अशक्य नसते. भारताला तिच्यासारख्या खेळाडूंचा अभिमान आहे आणि तिची यशोगाथा पुढील अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहील.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५३६२९५**

# किंचित शुभवार्ता!

येत्या काळात 'लिक्विड एलपीजी ऑफ-टेक सिस्टीम'चा अवलंब होणार असल्याचा सामान्यजनांना मोठा फायदा होऊ शकतो, ही पहिली महत्वाची बातमी. रेल्वे कर्मचाऱ्यांना कमी दरात गृहकर्ज मिळणार आणि इलेक्ट्रिक दुचाकी आणि रिक्षांसाठी पन्नास टक्के अनुदान मिळणार, ही बातमीही शुभवार्ता ठरणारी. दरम्यान, परदेशी गुंतवणूकदारांचे शेअर बाजारात पुनरागमन होत असल्याचेही संकेत मिळत आहेत.

सरत्या आठवड्यामध्ये अर्थनगरीमध्ये काही सकारात्मक बातम्या पुढे आल्या. सामान्य भारतीयाच्या दृष्टीने त्या महत्वाच्या ठरल्या. येत्या काळात 'लिक्विड एलपीजी ऑफ-टेक सिस्टीम'चा अवलंब होणार असल्याचा सामान्यजनांना मोठा फायदा होऊ शकतो, ही पहिली महत्वाची बातमी. रेल्वे कर्मचाऱ्यांना कमी दरात गृहकर्ज मिळणार असल्याची आणि इलेक्ट्रिक दुचाकी आणि रिक्षांसाठी पन्नास टक्के अनुदान मिळणार असल्याची बातमीही शुभवार्ता ठरणारी. दरम्यान, परदेशी गुंतवणूकदारांचे शेअर बाजारात पुनरागमन होत असल्याचेही संकेत मिळत आहेत. देशातील सरकारी तेल कंपन्या आता 'एलपीजी'चा अपव्यय कमी करण्यासाठी आणि इंधनाचा सर्वोत्तम वापर करण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देण्याची तयारी करत आहेत. 'इंडियन ऑइल', 'भारत पेट्रोलियम' आणि 'हिंदुस्तान पेट्रोलियम' यांसारख्या कंपन्या मोठ्या औद्योगिक आणि व्यावसायिक ग्राहकांमध्ये 'लिक्विड एलपीजी ऑफ-टेक सिस्टीम'चा अवलंब करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. या तंत्रज्ञानामुळे 'एलपीजी'चा अधिक चांगला वापर होईल आणि सिलेंडरमध्ये शिल्लक राहिलेल्या गॅसचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी होईल. सामान्यतः, 'एलपीजी' सिलेंडरमधून वाफेच्या स्वरूपात काढला जातो. या प्रक्रियेमुळे सिलेंडरमध्ये काही प्रमाणात 'एलपीजी' शिल्लक राहतो. त्यामुळे इंधनाचा पूर्ण वापर करता येत नाही. 'लिक्विड एलपीजी ऑफ-टेक' तंत्रज्ञानामध्ये, विशेष उपकरणांचा वापर करून 'एलपीजी' द्रव स्वरूपात काढला जातो. त्यानंतर 'व्हेपोरायझर'द्वारे त्याचे वायूमध्ये रूपांतर केले जाते. यामुळे सिलेंडर जवळजवळ पूर्णपणे रिकामा होतो आणि इंधनाचा अपव्यय कमी होतो. या तंत्रज्ञानाचा फायदा जास्त 'एलपीजी' वापरणाऱ्या उद्योगांना होईल. त्यात हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, केटरिंग, अन्न प्रक्रिया युनिट्स, डेअरी, रासायनिक उद्योग आणि इतर उत्पादन सुविधांचा समावेश आहे. वारंवार आणि मोठ्या प्रमाणात गॅसची आवश्यकता असणाऱ्या संस्थांसाठी हे तंत्रज्ञान खर्च वाचवू शकते आणि कामकाज अधिक कार्यक्षम बनवू शकते. तज्ज्ञांच्या मते, 'एलपीजी'च्या चोख वापरामुळे ग्राहकांसाठी इंधनाचा खर्च कमी होईल. तेल कंपन्यांना सिलिंडर हाताळणे आणि पुन्हा भरण्याशी संबंधित आव्हानांपासूनही दिलासा मिळू शकेल. यामुळे पुरवठा साखळीची कार्यक्षमता वाढेल आणि 'एलपीजी' वितरण प्रणाली अधिक प्रभावी होईल. भारतात 'एलपीजी'ची मागणी सातत्याने वाढत आहे. परिणामी, इंधनाच्या प्रत्येक थेंबाचा यथायोग्य वापर करणे हे सरकार आणि तेल कंपन्यांसाठी प्राधान्य बनले आहे. या धोरणाचा एक भाग म्हणून, ऊर्जेचा अपव्यय कमी करण्यासाठी आणि संसाधनांचा इष्टतम वापर सुनिश्चित करण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाला प्रोत्साहन दिले जात आहे. भविष्यात मोठ्या औद्योगिक ग्राहकांमध्ये 'लिक्विड एलपीजी ऑफ-टेक सिस्टीम'चा वेगाने विस्तार होईल अशी अपेक्षा आहे. यामुळे केवळ औद्योगिक परिचालन खर्च कमी होणार नाही, तर देशात ऊर्जा कार्यक्षमतेला प्रोत्साहन देण्यासही मदत होईल.

आता काही सकारात्मक अर्थवार्ता. रेल्वे बोर्डाने आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी गृहनिर्माण आगाऊ कर्जाचे व्याजदर निश्चित केले आहेत. नवीन आदेशानुसार रेल्वे कर्मचाऱ्यांना आता घर बांधणीसाठी केवळ ७.१ टक्के वार्षिक व्याजदराने निधी मिळणार आहे. या निर्णयामुळे कर्मचाऱ्यांवरील 'ईएमआय'चा भार थेट कमी होईल आणि महागाईच्या या काळात त्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळेल. रेल्वे बोर्डाने जारी केलेल्या अधिकृत अधिसूचनेनुसार नवीन ७.१ टक्के व्याजदर १ एप्रिल २०२६ पासून लागू झाले आहेत. हा दर ३१मार्च २०२७ पर्यंत मंजूर होणाऱ्या सर्व गृहनिर्माण आगाऊ कर्जांवर लागू होईल. गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयाने या संदर्भात १३ मे २०२६ रोजी एक निवेदन जारी केले होते. त्याच सरकारी आदेशानुसार रेल्वे बोर्डाने आपल्या कर्मचाऱ्यांसाठी हा दर तात्काळ प्रभावाने लागू केला आहे. मागील आर्थिक वर्षात (आर्थिक वर्ष २०२५-२६) गृहनिर्माण आगाऊ रकमेवरील व्याजदर वार्षिक ७.४४ टक्के होता. या विशेष सरकारी आगाऊ रकमेचा वापर केवळ तयार घर खरेदी करण्यापुरता मर्यादित नाही. रेल्वे कर्मचारी त्यांच्या गरजेनुसार विविध उद्देशांसाठी याचा वापर करू शकतात. भूखंड खरेदी करून त्यावर नवीन घर बांधण्याचा विचार करत असाल, तर ही रक्कम उपयुक्त ठरेल. बिल्डरकडून राहण्यासाठी तयार फ्लॅट खरेदी करत असाल किंवा केंद्र, राज्य किंवा गृहनिर्माण संस्थेच्या योजनेअंतर्गत घर खरेदी करत असाल, तर या सुविधेचा सर्वत्र उपयोग करू शकता. मालकीचे घर असल्यास कुटुंब वाढल्यावर नवी खोली किंवा मजला जोडायचा असल्यासही या कर्जाचा लाभ मिळेल. याच सुमारास गोवा सरकारने इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी मोठी घोषणा केली आहे. प्रस्तावित नव्या योजनेनुसार परवानाधारक बाइक टॅक्सी (मोटारसायकल पायलट) आणि ऑटो-रिक्षा चालकांना इलेक्ट्रिक वाहन खरेदीसाठी ५० टक्क्यांपर्यंत अनुदान देण्याची तयारी सुरू आहे. गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी सांगितले, की हे अनुदान सर्वसामान्य नागरिकांसाठी नसून केवळ परवानाधारक मोटारसायकल पायलट आणि ऑटो-रिक्षा चालकांनाच दिले जाईल. सार्वजनिक वाहतुकीत इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढवणे आणि चालकांचा इंधन खर्च कमी करणे हा या योजनेमागील उद्देश आहे. सरकार केवळ अनुदान देऊन थांबणार नाही. राज्यभरात इलेक्ट्रिक वाहनांचा वापर सुलभ करण्यासाठी सुमारे ७० नवीन ईव्ही चार्जिंग स्टेशन उभारण्याचीही योजना आहे. त्यामुळे वाहनधारकांना चार्जिंगची सुविधा सहज उपलब्ध होईल आणि लांब पल्ल्याच्या प्रवासातही अडचण येणार नाही. गोवा सरकारचे उद्दिष्ट राज्यातील प्रदूषण कमी करणे, पेट्रोल-डिझेलवरील अवलंबित्व घटवणे आणि पर्यावरणपूरक वाहतुकीला प्रोत्साहन देणे आहे. इलेक्ट्रिक वाहनांचा वापर पारंपरिक इंधनावरील वाहनांच्या तुलनेत कमी खर्चिक असल्याने बाइक टॅक्सी आणि रिक्षा चालकांचे उत्पन्नही वाढण्यास मदत होईल. सध्या ५० टक्के अनुदानाचा प्रस्ताव केवळ गोवा सरकारने मांडला आहे. ही योजना देशभर लागू नाही. इतर राज्यांमध्ये इलेक्ट्रिक वाहनांसाठी दिले जाणारे अनुदान त्या-त्या राज्यांच्या ईव्ही धोरणांनुसार आणि केंद्र सरकारच्या योजनांनुसार वेगवेगळे असू शकते. दरम्यान, सलग सहा महिने विक्रीचा सपाटा लावल्यानंतर परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी पुन्हा एकदा भारतीय शेअर बाजारात खरेदी सुरू केली आहे. जुलै महिन्यात आतापर्यंत त्यांनी सुमारे १.८ अब्ज डॉलर किमतीचे भारतीय समभाग खरेदी केले आहेत. या बदलामागे भारतीय अर्थव्यवस्थेतील मोठा बदल नसून जागतिक स्तरावरील कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) क्षेत्रातील गुंतवणुकीचा वेग कमी झाल्याचा परिणाम असल्याचे मत 'जेफरीज'चे 'ग्लोबल हेड ऑफ इक्विटी स्ट्रॅटेजी' क्रिस्टोफर वूड यांनी व्यक्त केले आहे. त्यांच्या मते, गेल्या काही महिन्यांमध्ये भारतीय बाजारातून झालेली विक्रमी विक्री ही भारतातील कमकुवतपणामुळे नव्हती. जागतिक गुंतवणूकदारांनी दक्षिण कोरिया आणि तैवानसारख्या देशांमधील 'एआय' आणि तंत्रज्ञान हार्डवेअर कंपन्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केल्यामुळे भारतातून पैसा बाहेर गेला होता. वूड यांच्या म्हणण्यानुसार यंदाच्या पहिल्या सहामाहीमध्ये उदयोन्मुख बाजारपेठांमधील फंडांनी भारतीय शेअर्सची विक्री करून सुमारे २९अब्ज डॉलरची गुंतवणूक 'एआय-केंद्रित' बाजारांमध्ये वळवली; मात्र आता परिस्थिती बदलताना दिसत आहे.

१५ जुलैपर्यंत 'एफआयआय'ने भारतीय शेअर्समध्ये १.८ अब्ज डॉलरची खरेदी केली असून, फेब्रुवारीनंतरची ही पहिली मासिक निव्वळ खरेदी मानली जात आहे. क्रिस्टोफर वूड यांच्या मते जुलैमधील खरेदी हे जागतिक गुंतवणूकदार 'एआय' कंपन्यांमधून काही निधी काढून इतर बाजारपेठांकडे वळवत असल्याचे संकेत आहेत. 'एआय' क्षेत्रातील तेजीच्या काळात भारतातून पैसा बाहेर गेला होता, तर आता त्या क्षेत्राचा वेग कमी होत असल्याने भारतीय बाजारात पुन्हा गुंतवणूक वाढू लागली आहे; मात्र 'एआय' गुंतवणुकीची लाट शिगेला पोहोचेल किंवा भारतीय शेअर बाजाराचे मूल्यांकन (व्हॅल्युएशन) लक्षणीय प्रमाणात कमी होईल तेव्हाच 'एफआयआय'ची मोठ्या प्रमाणावर आणि सातत्याने पुनरागमन होईल.

# पान १ वरुन...

### पीआर कार्ड नव्हे...

त्यांना लेखी निवेदन दिले होते. विशेष म्हणजे आपण दिलेल्या निवेदनाची तातडीने दखल घेत त्याच निवेदनावर जालन्यातील सर्वच झोपडपट्टी धारकांचे त्वरित सर्वेक्षण सुरू करण्याचे निर्देश मंत्री बावनकुळे यांनी जालन्याच्या जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांना दिले होते. जिल्हाधिकाऱ्यांनी देखील या प्रकरणी त्वरित निर्णय घेत जालना मनपाला सर्वेक्षण करण्यासाठी एजन्सी नियुक्त करण्याचे आदेश दिले होते. या आदेशानुसार जालना मनपाने नागपूर येथील सेंटर फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंट या एजन्सीची निवड करून त्यांना दि.१४ ऑक्टोंबर २०२५ रोजी जालन्यातील सर्वच झोपडपट्टी भागातील रहिवाशांचे सर्वेक्षण करण्यासाठी कार्यारंभ आदेश दिल्याचे सांगून माजी आमदार कैलास गोरंटयाल म्हणाले की, या सर्वेक्षणाचा शुभारंभ राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री तथा जालन्याच्या पालकमंत्री ना.पंकजाताई मुंढे यांच्या हस्ते आणि माजी केंद्रीयमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या प्रमुख उपस्थितीत चंदनझिरा येथे करण्यात आल्याचे नमूद केले. सर्वेक्षणासह जागेची मोजणी पूर्ण झाली असून ज्यांच्या जागेची मोजणी झाली त्यांना जालना मनपातर्फे मोजणी प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात येत आहे. झोपडपट्टी धारकांना पीआर कार्ड मिळावे या मागणीसह मुख्यमंत्री, महसूलमंत्री ते प्रशासकीय यंत्रणा अशा सर्व पातळ्यांवर आपण आणि भाजपाच्या सर्वच प्रमुख नेत्यांनी पाठपुरावा करून झोपडपट्टी धारकांना त्यांच्या हक्काच्या घराचे पीआर कार्ड उपलब्ध व्हावे यासाठी सातत्याने प्रयत्न केले असतांना, आपल्या पाठपुराव्याला यश, झोपडपट्टी धारकांना हक्काचे पीआर कार्ड मिळणार असा करणाऱ्या विद्यमान आमदारांची माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी चांगलीच खिल्ली उडविली आहे.

### इतिहास महाराष्ट्राचा...

कालावधी निश्चित करण्यात आला आहे. जालना शहर व जिल्ह्यातील सर्व शाळा, पालक, शिक्षक आणि बालकलाकारांनी या राज्यस्तरीय महोत्सवात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून महाराष्ट्राचा प्रेरणादायी इतिहास रंगभूमीवर जिवंत करावा, असे आवाहन *बालरंगभूमी परिषद, जालना शाखेच्या अध्यक्षा वैशाली शालिग्राम दाभाडे* यांनी केले आहे.

### जिल्ह्यात यलो अलर्ट...

/ लोंबणा-या तारांपासून दूर रहावे.वीजा चमकत असताना मोकळ्या जागेवर असल्यास सुरक्षेसाठी गुडघ्यावर बसून हाताने आपले कान झाकावे व आपले डोके दोन्ही गुडघ्यांच्यामध्ये झाकावे, जमीनीशी कमीतकमी संपर्क असावा.अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे शेतीमालाचे नुकसान टाळण्यासाठी शेतकरी बांधवांनी वेळीच नियोजन करावे. शेतक-यांनी शेतमाल सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावा. बाजार समितीमध्ये शेतमाल विक्रीसाठी आणला असेल किंवा त्याप्रमाणे नियोजन केले असेल, तर सदर मालाचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी,जनावरांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे.

सर्व नागरीकांनी वादळी वारे, वीज पासून स्वतः सह जनावरांचे संरक्षण होईल याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी, आपत्कालीन परिस्थितीत जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना तसेच नजीकचे तहसील कार्यालय, पोलीस स्टेशन यांचेशी संपर्क साधाण्याचे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

### जालन्यात...

महाराष्ट्राचे मा. राज्यपाल आणि मा. मुख्यमंत्री यांच्या नावे जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनासोबत २५,४२७ पानांवर संकलित करण्यात आलेल्या तब्बल ६,७१,३३४ नागरिकांच्या जनसमर्थनाच्या स्वाक्षऱ्या जोडण्यात आल्या. निवेदनामध्ये देशभरात गोहत्याबंदीबाबत कठोर केंद्रीय कायदा लागू करणे, गोमातेला राष्ट्रीय सन्मानाचा दर्जा देणे, गोसंरक्षण व गोसंवर्धनासाठी प्रभावी राष्ट्रीय धोरण राबविणे, गोशाळांना आवश्यक आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देणे आणि गोसेवेला अधिक बळकटी देण्यासाठी शासनाने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली. संत-महंतांच्या उपस्थितीने वाढली रॅलीची शोभा

रॅलीमध्ये विविध संत-महंत, धर्मगुरू आणि हिंदू संघटनांच्या प्रतिनिधींची उपस्थिती विशेष आकर्षण ठरली. संतांच्या मार्गदर्शनामुळे रॅलीला आध्यात्मिक अधिष्ठान लाभले. गोसंरक्षण हा केवळ धार्मिक नव्हे तर सामाजिक, सांस्कृतिक आणि पर्यावरणीय विषय असल्याचे मत अनेक वक्त्यांनी व्यक्त केले.

जालना शहर भगवामय रॅलीदरम्यान शहरातील प्रमुख रस्ते भगव्या ध्वजांनी सजले होते. सहभागींच्या हातातील भगवे ध्वज, घोषणांचा गजर, टाळ-मृदंगाचा निनाद आणि हरिनाम संकीर्तनामुळे संपूर्ण शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. रॅली पाहण्यासाठी नागरिकांनी रस्त्याच्या दुतर्फा मोठी गर्दी केली होती. आयोजकांनी मानले आभार

गो-सन्मान महा रॅलीच्या यशस्वी आयोजनानंतर आयोजकांनी संत-महंत, विविध हिंदू संघटना, स्वयंसेवक, माता-भगिनी, युवक, पोलीस प्रशासन, जिल्हा प्रशासन तसेच जालना जिल्ह्यातील सर्व नागरिकांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले. भविष्यातही गोसंरक्षण आणि गोसंवर्धनासाठी जनजागृतीची चळवळ अधिक व्यापक करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

या भव्य रॅलीमुळे जालना शहरात गोसंरक्षणाच्या विषयावर मोठ्या प्रमाणात जनजागृती झाली असून, समाजातील विविध घटकांनी एकत्र येत दिलेला प्रतिसाद हा या अभियानाच्या यशाचा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

# आनंदी जीवनासाठी गुरुकृपेचे महत्त्व

गुरू हे जीवनाला योग्य दिशा देणारे असतात. श्री दत्तगुरूंनी जसे २४ गुणगुरु केले, तसे प्रत्येक व्यक्ती आणि प्रत्येक प्रसंगातील गुण पाहण्याची दृष्टी गुरू देतात. परंतु आपण बहुधा स्वतःतील आणि इतरांतील गुणांकडे न पाहता स्वभावदोष व उणिवांकडेच लक्ष देतो. त्यामुळे जीवनातील आनंदाचे अनेक क्षण अनुभवण्यापासून वंचित राहतो. प्रत्यक्ष आनंदी जीवन जगण्यासाठी श्री दत्तगुरूंप्रमाणे प्रत्येकातील गुण पाहण्याची वृत्ती आवश्यक आहे. गुरुकृपायोगानुसार व्यक्तीतील स्वभावदोष आणि अहं कसे दूर होतात, तसेच आनंदमय जीवनाकडे वाटचाल कशी होते, यासंदर्भात माहिती सनातन संस्थेने संकलित केलेल्या या लेखातून पाहू.

**गुरुकृपेचे महत्त्व**

श्री गुरुचरित्र (१३:१३०) मध्ये म्हटले आहे, ''गंगेमुळे पाप, शशीमुळे ताप आणि कल्पतरूमुळे दैन्य नाहीसे होते; परंतु श्रीगुरूंच्या दर्शनाने पाप, ताप आणि दैन्य या तिन्हींचे हरण होते.

गुरु जीवाला मोक्षप्राप्तीचा मार्ग दाखवतात. गुरुकृपेमुळे साधकाच्या जीवनात अंतर्मुखता, सात्त्विकता आणि आत्मिक आनंद निर्माण होतो. ईश्वरात स्वभावदोष आणि अहं नसल्याने ईश्वराशी एकरूप होण्यासाठी स्वतःतील स्वभावदोष व अहं दूर करणे आवश्यक आहे. साधनेमुळे मन शुद्ध होऊन सूक्ष्मदृष्टी जागृत होते आणि जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन सकारात्मक बनतो. हे गुरुकृपेने साध्य होत.

**अष्टांग साधना**

नामजप, सत्संग, सत्सेवा, सत्साठी त्याग, निरपेक्ष प्रेम, स्वभावदोष-निर्मूलन, अहं-निर्मूलन आणि




भाववृद्धी हे गुरुकृपायोगातील अष्टांग साधनेचे टप्पे आहेत. यामुळे आध्यात्मिक उन्नती होते. ''सर्व काही ईश्वराच्या इच्छेनुसार होवो'' हा भाव अष्टांग साधनेने साधकात निर्माण होतो.

**आजच साधना सुरू करा**

तरुणांनी वृद्धापकाळाची वाट न पाहता तरुण वयातच साधना आरंभ करावी; कारण मनुष्यजन्माचा खरा उद्देश ईश्वरप्राप्ती हा आहे. वृद्धापकाळात विविध व्याधीं सुरू झाल्याने तिकडेच लक्ष अधिक असत. त्यावेळी व्याधी सुसह्य होण्यासाठी साधना आवश्यक आहे. गुरुकृपेच्या बळावर साधक आनंदमय जीवन जगण्यास सक्षम होतो.

**गुरुतत्त्वाच्या चरणी प्रार्थना**

अशा प्रकारे गुरुकृपायोगातील अष्टांग साधनेने साधकाला स्वभावदोष व अहं-निर्मूलनातून ईश्वरप्राप्तीच्या दिशेने नेऊन कलियुगातील अस्थिर जीवनात चिरंतन आनंद मिळतो. म्हणूनच गुरुकृपायोग हा केवळ साधनेचा मार्ग नसून आनंदमय आदर्श जीवन जगण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे. आपल्यातील स्वभावदोष आणि अहं दूर करून जीवनातील प्रत्येक क्षणाचा खरा आनंद अनुभवणे, हीच गुरुकृपा आहे.

या गुरुपौर्णिमेच्या पावन पर्वावर गुरुतत्त्वाच्या चरणी आपण प्रार्थना करूया ''हे भगवंता, हे गुरुमाऊली, आम्हाला जीवनातील प्रत्येक क्षण आनंदाने अनुभवता येऊ दे. त्यासाठी आमच्यातील स्वभावदोष आणि अहं दूर करण्याची शक्ती, तळमळ आणि सातत्यपूर्ण साधना करण्याची प्रेरणा आम्हाला द्या.''

**संकलन- श्री. दत्तात्रेय वाघूळदे,**
**सनातन संस्था संपर्क- ९२८४०२७१८०**

# जंतर-मंतरवरील विद्यार्थी आंदोलन : सरकारने देशाशी स्पष्टपणे संवाद साधावा- डॉ. भारत कऱ्हाड

दिल्लीतील जंतर-मंतर हे केवळ आंदोलनाचे ठिकाण नाही, तर लोकशाहीतील संवादाचे व्यासपीठ आहे. देशाच्या विविध भागांतून नागरिक आपल्या समस्या, अपेक्षा आणि मागण्या घेऊन येथे येतात. त्यामागे शासनाचे लक्ष वेधून घेणे, संवाद घडवून आणणे आणि प्रश्नांवर तोडगा शोधणे हा उद्देश असतो. सध्या जंतर-मंतरवर सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनानेही देशाचे लक्ष वेधून घेतले आहे. या आंदोलनात सहभागी विद्यार्थ्यांनी शिक्षण, परीक्षा, भरती प्रक्रिया, उत्तरदायित्व आणि पारदर्शकतेशी संबंधित विविध प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यांच्या मागण्यांशी सहमत किंवा असहमत असणे हा वेगळा विषय असू शकतो; परंतु या आंदोलनाने निर्माण केलेले प्रश्न आता सार्वजनिक चर्चेचा भाग बनले आहेत. विद्यार्थ्यांनी आपली भूमिका निवेदनांद्वारे, पत्रकार परिषदांद्वारे, सामाजिक माध्यमांद्वारे आणि प्रतिनिधींच्या माध्यमातून मांडली आहे. अनेकांनी त्यांच्या मागण्यांना पाठिंबा दिला आहे, तर अनेकांनी त्यावर प्रश्नचिन्हही उपस्थित केले आहे. या सर्व मतभेदांच्या पलीकडे एक महत्त्वाचा प्रश्न उभा राहतोया आंदोलनातून सरकारला नेमके काय समजले आहे? सरकार कोणत्याही आंदोलनाशी सहमत असेलच, असे नाही. प्रत्येक मागणी स्वीकारणेही सरकारवर बंधनकारक नाही. शासनाला कायदेशीर, आर्थिक, प्रशासकीय आणि व्यापक राष्ट्रीय हिताच्या चौकटीत निर्णय घ्यावे लागतात. त्यामुळे काही मागण्या स्वीकारल्या जाऊ शकतात, काहींमध्ये बदल सुचवले जाऊ शकतात, तर काही मागण्या नाकारल्याही जाऊ शकतात. हा निर्णय सरकारचा अधिकार आहे.

परंतु लोकशाहीमध्ये अधिकारासोबत उत्तरदायित्वही येते. त्यामुळे सरकारने विद्यार्थ्यांच्या मागण्यांचा कोणत्या दृष्टीने विचार केला, कोणत्या मुद्द्यांवर सहमती किंवा असहमती आहे, कोणत्या बाबींचा अभ्यास सुरू आहे आणि पुढील भूमिका काय असेल, हे अधिकृतपणे स्पष्ट करणे आवश्यक आहे. अशा प्रकारची स्पष्टता निर्माण झाली तर विद्यार्थी, पालक, शैक्षणिक संस्था आणि समाज यांच्यातील अनिश्चितता कमी होऊ शकते. याचबरोबर आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांवर कोणत्याही प्रकारचा अनावश्यक किंवा अवाजवी बळाचा वापर होऊ नये, हीदेखील तितकीच महत्त्वाची अपेक्षा आहे. कायदा व सुव्यवस्था राखणे ही शासनाची जबाबदारी असली, तरी शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांशी संवादाला प्राधान्य दिले गेले पाहिजे. जर कायद्याचे उल्लंघन झाले असेल, तर त्यावर कायदेशीर प्रक्रियेनुसार कारवाई होऊ शकते; मात्र विद्यार्थ्यांवर होणारी अनावश्यक मारहाण किंवा बळाचा असमतोल वापर लोकशाहीच्या मूल्यांशी सुसंगत मानला जाऊ शकत नाही. आंदोलनकर्ते विद्यार्थी हे देशाचेच नागरिक आहेत. त्यांच्या मतांशी सहमती असो वा नसो, त्यांच्या मानवी प्रतिष्ठेचे आणि घटनात्मक अधिकारांचे संरक्षण करणे ही राज्याची जबाबदारी आहे. अधिकृत भूमिका स्पष्ट झाली नाही की, तिची जागा तर्कवितर्क घेतात. सामाजिक माध्यमांवरील अपूर्ण माहिती, अनधिकृत दावे आणि अफवा यांमुळे संभ्रम वाढतो. अशा वेळी सरकारचे अधिकृत निवेदन हेच वस्तुस्थिती स्पष्ट करण्याचे सर्वात विश्वासार्ह माध्यम ठरते.

विद्यार्थी हे देशाचे भावी नागरिक, संशोधक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, उद्योजक आणि व्यावसायिक आहेत. त्यांच्या प्रश्नांना तात्काळ मान्यता मिळेलच असे नाही; परंतु त्यांना अधिकृत उत्तर मिळणे ही लोकशाहीतील स्वाभाविक अपेक्षा आहे. उत्तर सकारात्मक असो किंवा नकारात्मक, ते कारणांसह आणि स्पष्ट स्वरूपात असावे. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांनीही लोकशाही मार्गाचा अवलंब कायम ठेवणे आवश्यक आहे. आंदोलनाचा उद्देश संघर्ष वाढवणे नसून, संवादातून समाधान शोधणे हा असतो. त्यामुळे शासनाने संवादासाठी पुढाकार घ्यावा आणि विद्यार्थ्यांनीही चर्चेची संधी स्वीकारावी. संघर्ष जितका लांबतो, तितके नुकसान दोन्ही बाजूंना होते; संवाद जितका वाढतो, तितका लोकशाहीवरील विश्वास अधिक दृढ होतो. आज या आंदोलनाचा शेवट कधी आणि कसा होईल, याचा अंदाज बांधणे कठीण आहे. मात्र एक गोष्ट निश्चित आहेदीर्घकाळ चालणारी अनिश्चितता कोणाच्याही हिताची नसते. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक आयुष्य, त्यांच्या संधी आणि त्यांच्या भविष्यासंदर्भातील निर्णय वेळेशी निगडित असतात. त्यामुळे संवाद जितका वेळेवर आणि स्पष्ट असेल, तितका तो सर्वांसाठी हितावह ठरेल. शेवटी एकच प्रश्न उरतोजंतर-मंतरवर आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांचे म्हणणे सरकारने नेमके काय ऐकले? त्यातील कोणते मुद्दे सरकारला ग्राह्य वाटले? कोणत्या मागण्या मान्य होऊ शकत नाहीत? आणि त्यामागील कारणे काय आहेत? या प्रश्नांची उत्तरे विद्यार्थ्यांनी नव्हे, तर सरकारने द्यायची आहेत. कारण निर्णयाचा अधिकार सरकारकडे आहे आणि उत्तरदायित्वही सरकारचेच आहे. सरकारने प्रत्येक मागणी मान्य करावी, अशी अपेक्षा नाही. पण प्रत्येक महत्त्वाच्या आंदोलनाकडे सरकारने कोणत्या दृष्टीने पाहिले, कोणते निष्कर्ष काढले आणि पुढील दिशा काय असेल, हे अधिकृतपणे देशासमोर मांडणे ही लोकशाहीची अपेक्षा आहे.

जंतर-मंतरवरील आंदोलन उद्या संपेल किंवा पुढेही सुरू राहील; परंतु या आंदोलनाने उपस्थित केलेले प्रश्न केवळ रस्त्यावरचे नाहीत. ते शासन, प्रशासन आणि नागरिक यांच्यातील विश्वासाचे प्रश्न आहेत. विश्वास टिकवण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे स्पष्ट, अधिकृत आणि वेळेवर संवाद.

लोकशाहीत मौन कधीच अंतिम उत्तर नसते. अंतिम उत्तर असतेसंवाद, पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि प्रत्येक नागरिकाच्या मानवी प्रतिष्ठेचा सन्मान.



**डॉ. भारत कऱ्हाड,**
**प्राचार्य, वराडकर महाविद्यालय**
**दापोली, जिल्हा रत्नागिरी.**

# राजर्षी शाहू मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटीच्या ₹१०० कोटी सोने तारण कर्ज वाटपाचा ऐतिहासिक टप्पा जल्लोषात साजरा



**जालना -प्रतिनिधी**

राजर्षी शाहू मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटीने संस्थापक अध्यक्ष मा. श्री. संदीप दादा शेळके, संस्था अध्यक्षा मा. सौ. मालतीताई शेळके तसेच विभागीय व्यवस्थापक मा. श्री. गोविंद येवले यांच्या मार्गदर्शनाखाली ₹१०० कोटींचे सोने तारण कर्ज वाटप यशस्वीरित्या पूर्ण करून ऐतिहासिक टप्पा गाठला.

या उल्लेखनीय यशानिमित्त जालना शाखेत संचालक मंडळाच्या वतीने केक कापून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी संस्थेच्या यशस्वी वाटचालीबद्दल सर्वांनी समाधान व्यक्त करत पुढील प्रगतीस शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी संचालक श्री. विनायक थीगळे, श्री. ज्ञानेश्वर कदम, श्री. राजेंद्र गोरे, श्री. दशरथ शिंदे, श्री. संतोष गाजरे, श्री. श्रीकांत राठोड, श्री. बावणे, तसेच संचालिका सौ. पल्लवी गोफणे व सौ. नीता कापळे, शाखा व्यवस्थापक श्री. नामदेव आगिरकर तसेच शाखेतील सर्व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी सोने तारण विभाग प्रमुख श्री. परमेश्वर येवले यांचे विशेष अभिनंदन करण्यात आले. संस्थेची अशीच उत्तरोत्तर प्रगती होत राहो व अधिकाधिक ग्राहकांचा विश्वास संपादन करून नवे विक्रम प्रस्थापित होवोत, अशा शुभेच्छा उपस्थितांनी व्यक्त केल्या.

# ॥ सदगुरु प्रसादे पावन व्हावे ॥


।। ज्ञानमूलं गुरुःमुर्ती पूजामुलं गुरुः पदंम ।।
।। मंत्रमुलं गुरुःवाक्यं मोक्ष मुलं गुरुः कृपा ।।

।। गुरु ब्रम्हा गुरु विष्णू गुरु देवो महेश्वरः ।।
।। गुरु साक्षात परब्रम्ह तस्मै श्री गुरवे नमः ।।

आषाढ शुक्लपक्ष पौर्णिमेला गुरुपौर्णिमा म्हणतात. ह्या दिवशी महर्षि वेदोव्यासांचे पूजन करण्याची प्रथा आहे. आपल्या संस्कृतीत गुरुशिष्यांचे नात्याला अनन्यसाधारण महत्व आहे. जसे महर्षि व्यास आणि गणेश, वसिष्ठऋषी आणि श्रीराम,गोरक्षनाथ -निवृत्तीनाथ -ज्ञानेश्वर,जनार्दन स्वामी-एकनाथ महाराज, नामदेव महाराज-विसोबा खेचर.रामकृष्ण परमहंस- स्वामी विवेकानंद,स्वामी शिवानंद सरस्वती -सदगुरु ॐ मालतीदेवी,ही परंपरा आहे.

प्राचीन काळात विद्यार्थी आश्रमात शिक्षण घेत .त्यावेळी श्रध्देने गुरुपुजन करुन यथाशक्ति गुरूदक्षिणा देत होते.

या दिवशी आपण आई-वडिल-शिक्षक-आपल्या कला, क्रिडा,संगीत, विज्ञान, व्यवसायातील आपले मार्गदर्शक गुरु- व आध्यात्मिक क्षेत्रातील सदगुरूंचे प्रामुख्याने पुजन करतो.आपण बघतो गुरुपौर्णिमेला शेगांव श्री गजानन महाराज ,अक्कलकोट श्री स्वामी समर्थ ,गोंदवले श्री ब्रमदहचैतन्य गोंदवलेकर महाराज ,शंकरमठ पुणे. श्री शंकर महाराज ,मिरज ओम मालतीआई ,गरूडेश्वर वासुदेवानंद सरस्वती याठिकाणी गुरुपौर्णिमा उत्सव सर्व साधक एकत्र येऊन मोठ्या प्रमाणावर साजरा करत असतात.




चौऱ्यांशी लक्ष योनी नंतर मानवजन्म प्राप्ती होते.जन्ममृत्यूच्या फेऱ्यातून मोक्षप्राप्तीची वाट दाखवणारे सदगुरु मिळणे अतिशय भाग्याचे असते. गुरु मंत्र म्हणजे एक अभिवचन असते. गुरुला दिलेले वचन असते. गुरुप्रती काया वाचा मनाने तन मन धन याने सर्वार्थाने केलेले समर्पण असते. स्वच्छेने स्वीकारलेले बंधन असते. गुरु मंत्र घेईपर्यंतच तुम्हाला गुरु मंत्र घ्यायचा की नाही या निर्णयाचा अधिकार असतो. ज्या क्षणी तुम्ही गुरुमंत्र घेता त्याच क्षणी तुमची सर्व सूत्रे सदगुरु कडे जातात. तुमचा स्वयंनिर्णयाचा अधिकार संपुष्टात येतो. म्हणून गुरुर्वाक्यं प्रमाणं असे आपण म्हणतो. गुरुसाठी समर्पणाची तयारी ठेवावी लागते. गुरु प्रती अढळनिष्ठा संपूर्ण श्रद्धा आणि विश्वास असावा लागतो. गुरु मंत्र घेतल्याने तुमच्या कुठल्याही भौतिक समस्या सुटणार नाहीत. गुरु मंत्र म्हणजे समस्या मुक्तीचे साधन नाही तर अध्यात्मिक वाटचालीचा खडतर मार्ग आहे. गुरु व गुरुमंत्र तुम्हाला तुमच्या योग्यतेप्रमाणे तुम्ही जसजसे गुरुकृपेला पात्र होत जाल त्याप्रमाणे तुमची अध्यात्मिक प्रगती होत असते. म्हणजेच गुरुकृपेने तुमचा आध्यात्मिक वाटचालीचा खडतर मार्ग सुकर होत जातो.

गुरुप्रती आदर,श्रध्दा,दाखवण्याचा गुरुपौर्णिमा अतिशय महत्वाचा असा हा दिवस.ह्या दिवशी अनेक,शाळा, मठ,मंदिर, आश्रम,गुरूकुलात, गुरुपुजन करुन आपल्या सदगुरु प्रती कृतज्ञता व्यक्त केली जात असते.

आई -वडिल हेआपले पहिले गुरु आहेत. मुलांवर योग्य संस्कार करुन एक चांगली व्यक्ती बनण्यासाठी ते आपल्याला सक्षम करतात.त्यानंतर शालेय जीवनात शिक्षक हे गुरु स्थानी असतात. पण आज काहीच शाळा,कॉलेजेस मध्ये विद्यार्थी आपल्या शिक्षकरुपी गुरू समोर नतमस्तक होताना दिसतात. तरीपण खेदाने म्हणावे लागतेय की जेवढे ईतर दिवस आणि डे साजरे करण्याचे एक फँड सुरु आहे,त्यात ह्या दिवसाला शाळा-कॉलेजेस मध्ये फारसं महत्व दिल जात नाही ही सत्य परिस्थिती नाकारुन चालणार नाही. आणि आता तसे शिक्षक-विद्यार्थ्यांचे संबधही राहिलले नाहीत, हेच प्रमुख कारण म्हणावे लागेल.

आध्यात्मिक मार्गातील अनेक व्यक्ती आपल्या सदगुरुंचे भक्तीभावाने पुजन करुन आशिर्वाद घेतात.गुरुपौर्णिमा ही सद्गुरुंचे पुजनाची पौर्णिमा आहे.प्रत्यक्ष शक्य असेल तर प्रत्यक्षात नाही तर घरीच गुरुपूजन करतात.

हार, फुलं, गुरूचरणी वाहून काही गोड पदार्थ, पेढे, अर्पण करतात. यथाशक्ति, ऐपती नुसार गुरूदक्षिणा अर्पण करतात.आणि दिवस गुरुसेवेत,गुरुसान्निध्यात घालवतात.

गुरु आपल्या जीवनातला अज्ञानरुपी अंधकार दूर करुन. ज्ञानाचा,प्रकाशाचा मार्ग दाखवतात. आनंदीजीवन कसे जगावे शिकवतात.गुरु शब्दाचा अर्थच मुळात अंधार नाहीसा करणे हा आहे.गुरु ज्ञानाचा सागर असतात.गुरुजवळ विनम्रभावनेने गेल्यावर ते आपला रिकामा लोटा ज्ञानरुपी जलाने भरुन देतात.गुरुच्या कृपेनेच शिष्य मोठे कार्य करु शकतो.निवृत्तीनाथ ह्याच्या गुरुकृपेतूनच ज्ञानेश्वरांच्या हातून ज्ञानेश्वरी लेखनाची महत कार्य घडलं. छत्रपती शिवाजी महाराज एकदा शिवथरघळीला आपल्या तलवारी अभिमंत्रीत करायला व समर्थांचे दर्शनला गेले होते.महाराजांनी विडा.तांबुल खाणे सोडले होते.ही गोष्ट समर्थांना माहित होती.दर्शना नंतर समर्थांनी महाराजांचे हातावर विडा ठेवला,महाराजांनी तो तात्काळ भक्षण केला.समर्थ महाराजांना म्हणाले राजे- ''आम्ही ऐकले होते तुम्ही तांबुल विडा वर्जिला ऐसे ''? त्यावर महाराज तात्काळ म्हणाले- महाराज ''आम्ही विडा,तांबुल नाही सेवीला,आम्ही प्रसाद सेविला ''असा भाव,व दृढश्रध्दा,गुरुप्रती हवी.

।। गुरूर्ब्रह्मा गुरूर्विष्णुः गुरूर्देवो महेश्वरः।।
।। गुरु साक्षात परब्रम्ह तस्मै श्री गुरवे नमः।।

हा श्लोक आपण रोज म्हणत असतो.गुरु हे प्रत्यक्षात ब्रम्हा,विष्णू, आणि महेश म्हणजेच शिव आहेत.आणी साक्षात परब्रम्हच आहेत.अशा गुरुंना आपण नमस्कार करतो. आपण बघतो, माणूस किती मोठा असो,श्रीमंत असो,अधिकारी असो गुरु चरणाशी नतमस्तक होतो.ज्ञान प्राप्तीसाठी, जीवनात आत्मानंद मिळवण्यासाठी त्याला गुरूची आवश्यकता ही असतेच.गुरु शिवाय जीवन अपूर्णच आहे म्हणावे लागते.गुरु कडून प्रेरणा मिळत असते.

म्हणून म्हणतात-
सदगुरु सारीखा असता पाठीराखा.।।
इतरांचा लेखा कोण करी.।।
म्हणुन....
धरावे पाय आधी सदगुरुचे.

आयुष्यात सुख दुखाःचे अनेक चढउतार येत असतात.माणूस खचून जातो.अशावेळी आपले सदगुरुच पाठीशी उभे असतात.आपल मनोवल वाढवित असतात.अडचणीतून मार्ग दाखवितात.

आयुष्याचा पथ हा दुर्गम,
अवघड डोंगर घाट.।।
गुरुविण कोण दाखविल वाट.।।

आज आपण बघतो, गावागावात, शहरात,कॉलन्या-कॉलन्या मध्ये गुरुपौर्णिमा उत्सव मोठ्या उत्साहात साजरे केले जातात.

ते व्हायलाच हवे. फक्त त्यात केवळ उत्सवीपणा नसावा. असे मोठे मोठे उत्सव साजरे करण्या बरोबर आपल्या सदगुरुंनी आपल्याला जे ज्ञान दिले आहे,जी शिकवण दिली आहे,जो उपदेश दिला आहे,त्याचे आचरण करणे . गुरुमंत्र दिला आहे त्याचा जप करणे.साधना करणे.नामात तल्लीन होणे.हीच खरी गुरूपूजा आणि गुरूदक्षिणा आहे.सदगुरुंना हेच अपेक्षित असते. ह्याच प्रत्त्येकाला किती भान आहे ?हे लक्षात ठेवणे महत्वाचे आहे.नेमका त्याचाच विसर पडत चाललाय असे वाटत नाही का? गुरुपौर्णिमेला आपल्या सदगुरुंचे पुजन करुन यथाशक्ती गरुदक्षिणा अर्पावी व प्रसाद घ्यावा आणि ''सदगुरु प्रसादे पावन व्हावे'' आणि आपल्या सदगुरुंचे आशिर्वाद घ्यावेत .



मिरज निवासी माझ्या सदगुरु ओम मालतीआईंचे चरणी कोटी प्रणाम.

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरा ।
गुरु साक्षात परब्रम्ह तस्मै श्री गुरुवे नमः ।।

**दिलीप देशपांडे.**
**जामनेर.जळगांव.**
**मो.नं-८९९९५६६९१७**

# गोडाऊन फोडून सोयाबीन चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश; ३ आरोपी अटकेत, एका विधीसंघर्षग्रस्त बालकाचा सहभाग

## ₹२.०५ लाखांचा मुद्देमाल जप्त; चंदनझिरा पोलिसांची कारवाई

**जालना -प्रतिनिधी**

जालना शहरातील नवीन मोंढा परिसरात असलेल्या भक्ती एक्सेट्रेशन प्रा. लि. कंपनीच्या गोडाऊनमध्ये फोड करून मोठ्या प्रमाणात सोयाबीन चोरी करणाऱ्या टोळीचा चंदनझिरा पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या प्रकरणी तीन आरोपींना अटक करण्यात आली असून एका विधीसंघर्षग्रस्त बालकाचा सहभागही निष्पन्न झाला आहे. आरोपींकडून चोरीचे २१ क्विंटल ५० किलो सोयाबीन, चोरीसाठी वापरण्यात आलेली रिक्षा असा एकूण ₹२ लाख ५ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याशिवाय चोरीचा माल खरेदी करणाऱ्या दोन व्यापाऱ्यांकडूनही सोयाबीन जप्त करण्यात आले असून या कारवाईमुळे नवीन मोंढा परिसरातील धान्य चोरीच्या आणखी काही गुन्ह्यांचा उलगडा होण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

**गोडाऊन फोडून सोयाबीनची चोरी**

२३ जुलैच्या मध्यरात्री नवीन मोंढा परिसरातील भक्ती एक्सेट्रेशन प्रा. लि. कंपनीच्या गोडाऊनचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी मोठ्या प्रमाणात सोयाबीनची चोरी केली होती. दुसऱ्या दिवशी ही बाब उघडकीस आल्यानंतर कंपनीच्या व्यवस्थापकांनी चंदनझिरा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी घरफोडी व चोरीचा गुन्हा नोंदवून तपास सुरू केला.

**तांत्रिक तपास आणि गुप्त माहितीच्या आधारे आरोपी जाळ्यात**

पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू यांनी हा गुन्हा तातडीने उघडकीस आणण्याच्या सूचना पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार यांना दिल्या. त्यानुसार चंदनझिरा पोलिसांच्या पथकाने तांत्रिक विश्लेषण, गुप्त माहिती आणि स्थानिक माहितीदारांच्या मदतीने तपासाची चक्रे वेगाने फिरवली.या तपासादरम्यान शेख अब्दुल शेख हारुन (रा. हिंदनगर, नवीन मोंढा), वैभव भास्कर लांडगे (रा. कन्हैयानगर), किशोर किसन फुलवाडे (रा. कन्हैयानगर) तसेच एका विधीसंघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्यांनी गुन्ह्याची कबुली दिल्यानंतर तिन्ही प्रौढ आरोपींना अटक करण्यात आली. न्यायालयाने त्यांना चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.

**चोरीचा माल व्यापाऱ्यांना विकल्याची कबुली**

पोलीस कोठडीत आरोपींकडून सखोल चौकशी करण्यात आली असता, चोरी केलेल्या सोयाबीनपैकी काही माल नवीन मोंढा परिसरातील व्यापाऱ्यांना विकल्याची माहिती समोर आली. त्यानुसार पोलिसांनी अशरफखान इस्माईलखान (रा. खांडसरी, जालना) आणि गजानन बंडेराव सोनवणे (रा. वडीवाडी, जालना) यांच्याकडून चोरीचे सोयाबीन जप्त केले. या प्रकरणात चोरीचा माल खरेदी-विक्री करणाऱ्या व्यक्तींची भूमिकाही पोलिसांकडून तपासली जात आहे.



**₹२.०५ लाखांचा मुद्देमाल जप्त**

या कारवाईत पोलिसांनी आरोपींकडून सुमारे ₹१ लाख १४ हजार किमतीचे २१ क्विंटल ५० किलो सोयाबीन जप्त केले. तसेच चोरीसाठी वापरण्यात आलेली सुमारे ₹९० हजार किमतीची रिक्षाही जप्त करण्यात आली. अशा प्रकारे एकूण ₹२ लाख ५ हजारांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे.

**आणखी धान्य चोरीचे गुन्हे उघड होण्याची शक्यता**

प्राथमिक तपासात आरोपींचा नवीन मोंढा परिसरातील इतर धान्य चोरीच्या घटनांशीही संबंध असण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे पोलिसांकडून आरोपींची सखोल चौकशी सुरू असून आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता नाकारता येत नाही. या प्रकरणाचा पुढील तपास हेड कॉन्स्टेबल संदीप उगले करीत आहेत.

**वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी कारवाई**

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली चंदनझिरा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार यांच्या नेतृत्वात करण्यात आली. या मोहिमेत पोलीस उपनिरीक्षक दिगंबर पवार, पोलीस हेड कॉन्स्टेबल कृष्णा तंगे, समाधान उगले, विशाल लोखंडे, अभिजीत वायकोस, सागर खैरे, गजानन काकडे, चालक सुभाष नागरे तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस हेड कॉन्स्टेबल सागर बावस्कर यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. चंदनझिरा पोलिसांच्या या कारवाईमुळे धान्य चोरी करणाऱ्या टोळीला मोठा आळा बसला असून, नवीन मोंढा परिसरातील व्यापारी व व्यावसायिकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.

# आठ मोटारसायकल चोरीचे गुन्हे उघड, ५ आरोपी जेरबंद

## नऊ मोटारसायकली, एक नॅनो कार व वाहनांचे सुटे पार्ट्स असा ₹५.१५ लाखांचा मुद्देमाल जप्त; आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता

**अंबड । प्रतिनिधी**

अंबड शहरात गेल्या काही दिवसांपासून वाढलेल्या मोटारसायकल चोरीच्या घटनांना आळा घालण्यात अंबड पोलिसांना मोठे यश मिळाले आहे. अंबड पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने नियोजनबद्ध तपास करून वाहनचोरांच्या टोळीचा पर्दाफाश केला असून, या कारवाईत ८ मोटारसायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणत ५ आरोपींना ताब्यात घेतले आहे. आरोपींकडून ९ मोटारसायकली, एक नॅनो कार तसेच इंजिन, मॅग व्हील, पेट्रोल टँकसह मोठ्या प्रमाणात वाहनांचे सुटे पार्ट्स असा एकूण ₹५ लाख १५ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

अंबड शहरात सातत्याने घडणाऱ्या मोटारसायकल चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. वाहनचोरीच्या वाढत्या घटनांची गंभीर दखल घेत अंबड पोलिसांनी समांतर तपास सुरू केला. गुप्त माहिती, तांत्रिक तपास आणि स्थानिक माहितीदारांच्या मदतीने वाहनचोरांच्या टोळीपर्यंत पोहोचण्यात पोलिसांना यश आले.

अशी होती चोरीची पद्धत पोलिस तपासात आरोपी अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने चोरी करत असल्याचे समोर आले. टोळीतील एक सदस्य सार्वजनिक ठिकाणी पार्क केलेल्या मोटारसायकलींवर लक्ष ठेवत असे. वाहनमालक वाहन उभे करून निघून गेल्यानंतर इतर साथीदार काही क्षणांत मोटारसायकल चोरी करून घेऊन जात असत.

चोरी केलेली वाहने निर्जनस्थळी नेऊन त्यांची तोडफोड केली जात असे. त्यानंतर इंजिन, मॅग व्हील, पेट्रोल टँक आणि इतर सुटे भाग वेगळे करून गरजू व्यक्तींना कमी किमतीत विक्री केली जात होती. त्यामुळे चोरीच्या वाहनांचा माग काढणे कठीण होत होते. गुप्त माहितीवरून टोळीपर्यंत पोहोचले पोलीस

अंबड पोलिसांना गुप्त माहिती मिळाली की, अंबड येथील मदीना चौक परिसरातील इरफान शेख अलताफ शेख याच्याकडे विविध मोटारसायकलींचे इंजिन, मॅग व्हील व इतर सुटे पार्ट्स विक्रीसाठी उपलब्ध आहेत. त्यानुसार पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने धक्कादायक माहिती दिली.

चौकशीत लखन दिलीप खुळे (रा. छत्रपती संभाजीनगर, सध्या चांगले नगर, अंबड), सुशिल उर्फ मायकल

**अंबड पोलिसांची कारवाई;**

अंकुश खुळे (रा. चांगले नगर, अंबड), समीर सलीम सैय्यद व अज्जु सलीम सैय्यद (दोघेही रा. अंबड) यांच्या मदतीने चोरीच्या मोटारसायकली तोडून त्यांचे स्पेअर पार्ट्स विक्री केल्याची कबुली त्याने दिली.

या माहितीनंतर पोलिसांनी तातडीने लखन खुळे, सुशिल उर्फ मायकल खुळे तसेच इतर साथीदारांना ताब्यात घेतले. सखोल चौकशीत त्यांनीही मोटारसायकल चोरी करून त्यांचे सुटे भाग विक्री केल्याची कबुली दिली.

₹५.१५ लाखांचा मुद्देमाल जप्त या कारवाईत पोलिसांनी आरोपींकडून ९ मोटारसायकली, एक नॅनो कार, इंजिन, मॅग व्हील, पेट्रोल टँक आणि मोठ्या प्रमाणात वाहनांचे इतर सुटे पार्ट्स असा एकूण ₹५ लाख १५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईमुळे मोटारसायकल चोरीचे एकूण ८ गुन्हे उघडकीस आले असून, आरोपींकडून आणखी काही गुन्ह्यांचा उलगडा होण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई

ही उल्लेखनीय कारवाई पोलीस अधीक्षक तेघबीर सिंग संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. सिद्धेश्वर धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली अंबड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष घोडके यांच्या नेतृत्वात करण्यात आली. या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक भगवान नरोडे तसेच गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. अंबड पोलिसांच्या या धडाकेबाज कारवाईमुळे वाहनचोरांच्या टोळीला मोठा आळा बसला असून, वाढत्या वाहनचोरीच्या घटनांवर नियंत्रण मिळविण्यास मदत होणार असल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. तसेच चोरीच्या वाहनांची खरेदी-विक्री करणाऱ्यांवरही पोलिसांचे लक्ष असून, तपास आणखी व्यापक करण्यात आला आहे.

## चौंथी शिष्यवृत्ती परीक्षेत मूर्तीच्या विद्यार्थिनींची दमदार कामगिरी; वैष्णवी क्षीरसागर व स्वाती बोबडे यांचा जाहीर सत्कार

**जालना – प्रतिनिधी**

घनसावंगी तालुक्यातील मूर्ती येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने पुन्हा एकदा शैक्षणिक गुणवत्तेचा ठसा उमटवत इयत्ता चौथी शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. शाळेतील विद्यार्थिनी वैष्णवी सुनील क्षीरसागर आणि स्वाती विष्णू बोबडे यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरून शाळेसह गावाच्या शैक्षणिक नावलौकिकात भर घातली.

या उज्ज्वल यशाबद्दल शाळेच्या वतीने दोन्ही विद्यार्थिनींचा पुष्पगुच्छ, शाल आणि भेटवस्तू देऊन उत्साहपूर्ण सत्कार करण्यात आला. यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सर्व सदस्य, महा. पोलीस मित्र संघ महाराष्ट्र राज्य, घनसावंगी तालुका अध्यक्ष अण्णासाहेब अडागळे, विद्यार्थिनींचे पालक, शिक्षकवृंद तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच या यशातून प्रेरणा घेऊन इतर विद्यार्थ्यांनीही जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या बळावर शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करावी, असे आवाहन करण्यात आले.

या उल्लेखनीय यशामुळे शाळा परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, दोन्ही विद्यार्थिनींवर पालक, शिक्षक आणि ग्रामस्थांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मूर्तीच्या या यशामुळे संपूर्ण घनसावंगी तालुक्याच्या शैक्षणिक क्षेत्रात अभिमानाची भावना व्यक्त केली जात आहे.

## आषाढी एकादशी निमित्त पाटोदा जिल्हा परिषद शाळेची वृक्षदिंडी, ग्रंथदिंडी व शिक्षणाची वारी उत्साहात

**मंठा - प्रतिनिधी**

तालुक्यातील पाटोदा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व प्रशालेत शनिवार, २५ जुलै २०२६ रोजी 'आनंददायी शनिवार' उपक्रमांतर्गत आषाढी एकादशीचे औचित्य साधून वृक्षदिंडी, ग्रंथदिंडी आणि शिक्षणाची वारी उत्साहात काढण्यात आली.



या उपक्रमात विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांची पारंपरिक वेशभूषा परिधान करून डोक्यावर तुळस, हातात टाळ आणि ग्रंथ घेऊन सहभाग नोंदविला. 'ज्ञानबा-तुकाराम', 'माऊली माऊली', 'ज्ञानोबा-तुकाराम' अशा नामघोषांनी परिसर भक्तिमय झाला.

संपूर्ण गावातून काढण्यात आलेल्या प्रभात फेरीत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. बाजार परिसरात विद्यार्थ्यांनी भक्तिगीते व वारकरी परंपरेशी संबंधित सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. ग्रामस्थांनी दिंडीचे उत्स्फूर्त स्वागत करत विद्यार्थ्यांना खाऊचे वाटपही केले.

मुख्याध्यापक व सर्व शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या उपक्रमातून विद्यार्थ्यांना वारकरी परंपरा, वाचन संस्कृती, पर्यावरण संवर्धन आणि शिक्षणाचे महत्त्व यांची प्रेरणा देण्यात आली. शाळेत दिंडी परत आल्यानंतर पूरक आहाराचे वाटप करून दिंडीची सांगता करण्यात आली.

## परतूर येथील मनोहर खालापुरे यांना नेत्रसेवेबद्दल आंतरराष्ट्रीय सन्मान

**परतूर - प्रतिनिधी**

दृष्टी व जालना लायन्स फाउंडेशनचे अध्यक्ष मनोहर खालापुरे यांच्या नेत्रसेवेतील उल्लेखनीय कार्याची आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली असून, त्यांना लायन्स इंटरनॅशनलतर्फे प्रतिष्ठेच्या आंतरराष्ट्रीय अध्यक्ष पुरस्काराने गौरविण्यात आले.

छत्रपती संभाजीनगर येथे रविवारी आयोजित प्रांत कॅबिनेट शपथविधी कार्यक्रमात माजी आंतरराष्ट्रीय अध्यक्ष ए. पी. सिंग यांच्या हस्ते खालापुरे यांना सन्मानचिन्ह, गौरवपत्र व पिन प्रदान करण्यात आला.




ग्रामीण भागात मोफत नेत्रतपासणी शिबिरे, गरजू रुग्णांसाठी सातत्यपूर्ण सेवा, नेत्रालय उभारणी तसेच समाजाभिमुख आरोग्य उपक्रम राबविण्यात त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या या कार्याचा गौरव म्हणून हा आंतरराष्ट्रीय सन्मान प्रदान करण्यात आल्याने परतूर व जालना जिल्ह्यासाठी ही अभिमानाची बाब मानली जात आहे.

## श्री आंनद स्वामी महाराज पालखीचे मुस्लिम बांधवां तर्फे स्वागत

**जालना - प्रतिनिधी**

प्रति वर्षांनुसार यावर्षीही श्री आनंद स्वामी महाराज पालखी मिरवणूक निमित्त संस्थानाच्या विश्वस्त पदाधिकाऱ्यांचा शनिवार रोजी दुपारी चार वाजता जामा मस्जिद माळीपुरा येथे स्वर्गीय शेख अख्तर लीडर मित्र मंडळ जालनाच्या वतीने सत्कार आणि भावीक भक्तांना फरांळ वाटप करण्यात आले, सामाजिक सलोखा , ऐक्य आणि शांततेचा प्रतीक म्हणून दरवर्षी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहेत




, याप्रसंगी जिल्हा पोलीस अधीक्षक तेगबीर सिंग संधु , अप्पर जिल्हा पोलीस अधीक्षक विक्रम साळी , उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी, ज्येष्ठ सामाजिक नेते एकबाल पाशा, पोलीस निरीक्षक गजानन शेवाळे , शहा आलम खान , आयुब खान , सय्यद रहीम कार्यक्रमाचे संयोजक शेख मुजम्मिल आदी पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.




वीज कामगारावरती झालेल्या अन्यायाचे विरोधात महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशन संघटनेचे अधीक्षक अभियंता महावितरण मंडल कार्यालय जालना येथे आजपासून बेमुदत आमरण उपोषण सुरू छायाचित्र किरण खानापुरे

## रायगड येथे निवासी प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या पोलीस पाटील व कोतवालांना जिल्हाधिकारी यांच्या हस्ते आपदा मित्र किट व प्रमाणपत्रांचे वितरण

**जालना - प्रतिनिधी**

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जालना यांच्या वतीने रायगड येथे आयोजित १२ दिवसांचे निवासी आपदा मित्र प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करून आलेल्या ६८ पोलीस पाटील व कोतवालांना आज जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण आशिमा मित्तल यांच्या हस्ते आपदा मित्र किट तसेच प्रशिक्षण पूर्ण केल्याबद्दल प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करताना सांगितले की, गावपातळीवर सक्षम व प्रशिक्षित स्वयंसेवकांची फळी निर्माण करून आपत्ती व्यवस्थापन अधिक परिणामकारक करण्यासाठी जिल्हा प्रशासन सातत्याने प्रयत्नशील आहे. आपत्तीच्या प्रसंगी गावपातळीवर सर्वप्रथम मदतीसाठी धावून जाणारे पोलीस पाटील व कोतवाल हे प्रशासनाचे महत्त्वाचे दुवे असून, रायगड येथे प्राप्त केलेले आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण, शोध व बचाव कार्य, प्रथमोपचार, पूर, वीज पडणे, अग्नी दुर्घटना, सर्पदंश तसेच आपत्कालीन परिस्थितीतील समन्वयाचे कौशल्य प्रत्यक्ष कार्यात वापरून गावातील नागरिकांचे जीवित व वित्तहानी कमी करण्यासाठी त्यांनी सक्रिय भूमिका बजावावी, असे आवाहन त्यांनी केले.

रायगड येथे आयोजित निवासी प्रशिक्षणामध्ये प्रशिक्षणार्थींना तज्ज्ञ प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली आपत्तीपूर्व तयारी, आपत्तीच्या काळातील तात्काळ प्रतिसाद, शोध व बचाव कार्य, प्रथमोपचार, दोरीच्या साहाय्याने बचाव तंत्र, जलबचाव, अग्निसुरक्षा, समुदाय आधारित आपत्ती व्यवस्थापन तसेच विविध आपत्तीजन्य परिस्थितींचा प्रत्यक्ष सराव देण्यात आला.

प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केलेल्या ६८ पोलीस पाटील व कोतवालांना गावपातळीवर प्रभावी आपत्कालीन प्रतिसाद देण्यासाठी आवश्यक साहित्य असलेले आपदा मित्र किट तसेच प्रशिक्षण पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र जिल्हाधिकारी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. यावेळी जालना शहर महानगरपालिकेच्या महापौर वंदनाताई मगरे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी दीपक काजळकर, सतीश उढाण, ज्ञानेश्वर राऊत, छत्रसिंग कायते, राहुल बिजुले तसेच प्रशिक्षण पूर्ण केलेले पोलीस पाटील व कोतवाल उपस्थित होते.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.